MASTERLINE EXPRESS

नियोजनबध्द काम करून स्वत: व कंपनीचा उद्देश साध्य करावा - संचालक श्री. सुयोगभाऊ जैन

सेल्स विभागाची "त्रैमासिक आढावा" बैठक : विविध विषयांवर चर्चा

बैठकितील ठळक मुद्दे



- "मेंक द रुल्स ऑर फॉलो द रुल्स"
- विविध विषयांवर सखोल चर्चा
- तीन दिवस "आढावा बैठक"
- "नवीन" योजनांवर माहिती
- प्रत्यक्ष संपर्कावर भर
- सेल्स टीम महत्वाचा दुवा
- बाजारपेठेचे ज्ञान गरजेचे *क्रीएटीव्हीटीवर भर *कंपनीत छोट्या स्पर्धा

योग्य नियोजन करून स्वत: व कंपनीचा उद्देश साध्य करावा, असे आवाहन संचालक श्री. सुयोगभाऊ जैन यांनी केले. मास्टरलाईन कंपनीतर्फे ७, ८ व ९ जून रोजी कंपनीच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये सेल्स विभागाच्या त्रैमासिक आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. उपस्थित सेल्स कर्मचारी यांना मार्गदर्शन करीत असतांना श्री. जैन बोलत होते. यावेळी चॅनल सेल्सचे नॅशनल हेड श्री. रितेश सिंह राठौर, प्रशासकीय मॅनेजर श्री. मनोज महाजन, रमजान पटेल यांची उपस्थिती होती. सेल्स त्रैमासिक आढावा बैठकीला शिलज पांडे, तुषार काकुर्डे, प्रश्रांत सुभेदार, ज्ञानेश्वर गोसावी, अमोल भोयर, समीर शेख, मसना शेख, महेश शिरूरे आदी हजर होते. एप्रिल, मे व जून अशी तिमाही आढावा बैठक घेण्यात आली.

मार्केटमधील अभ्यासावर यश अवलंबून - श्री. राठौर



कंपनी किंवा सेल्स टीम ही राज्यासह शेजारील राज्यातही प्रॉडक्ट विकत असते. मार्केटमध्ये ऑईलचे विविध प्रॉडक्ट आहेत. किंमतीही वेगवेगळ्या आहेत. स्पर्धा आहे. असे असले तरी आपले ऑईल इतर कंपण्याच्या तुलनेत क्वालिटी, किंमत व इतर बाबींमध्ये सरस ठरत आहे. आपल्याला अधिक स्पर्धक नाहीत. त्यामुळे सेल्स टीमने मार्केटमधील बारकांव्यांचा बारकाईने अभ्यास करावा. ज्यांचा अभ्यास चांगला असतो, ते हमखास यशस्वी होतातच, असा विश्वास कंपनीतील चॅनल सेल्सचे नॅशनल हेड श्री. रितेश सिंह राठौर यांनी व्यक्त केला. तसेच ते पुढे म्हटले की, सेल्स टीमला ज्या प्रमाणे कंपनीकडून अपेक्षा असतात, तशा कंपनीलाही असतात. आपापल्या विभागात डिस्ट्रीब्युटर नेमणे, ऑईल व्यवस्थित ग्राहकांपर्यंत पोहचते का ? कंपनीच्या स्किमपासून कुणी वंचीत तर राहत नाही ना ? मॅकेनिकल रॉयल्टी प्रॉग्राम, सबडिलर या किंवा त्यापेक्षा अधिक बाबींकडे सेल्स टीमने लक्ष द्यावे असे आवाहन श्री. राठौर यांनी करून पुर्ण सेल्स टीमचा आढावा घेत पुढील रतनिती आखून दिली.

MASTERLINE EXPRESS



सेल्स कर्मचारी वर्गाला सुयोगभाऊ जैन यांचे मार्गदर्शन

आढावा बैठकित सेल्स कर्मचारी यांना मार्गदर्शन करतांना श्री. सुयोगभाऊ जैन म्हणाले की, कंपनीने गत तीन महिन्यात हायस्ट सेल्स गाठला आहे. यात आपला वाटा महत्वाचा आहे. मार्केटमध्ये "रॉ" मटेरिअलच्या किंमती वाढल्या असून काही प्रमाणावर तुटवडाही जाणवत आहे.,कंपनी चांगल्या प्रतीचे ऑईल निर्माण करतेच आणि किंमतीही योग्यशीर असतात. त्यामुळेच मास्टरलाईनच्या ऑईल व ग्रीसला दिवसागणिक मागणी अधिक मिळत आहे. मॅकेनिक, सबडिलर, डिस्ट्रीब्युटर यांच्यापर्यंत कंपनीच्या सेवा पोहचविल्या जात आहेत. काळानुरूप व मागणीनुसार प्रॉडक्टमध्येही बदल केले गेले आहेत. कंपनी व ग्राहक यांच्या मधील "दुवा" म्हणून सेल्स विभाग काम करीत असतो. त्यामुळे सेल्स टीमने बाजारपेठेतील स्वता:चे संबंध, चांगला व्यवहार, प्रत्यक्ष संपर्क, योग्य माहिती, स्वताचा पिजीपी रूट, प्रॉडक्ट नॉलेज, शिस्त पाळणे, नवीन संकल्पना मांडणे, स्किम बनविणे, मॅकेनिक पासून ते डिलर पर्यंतच्या समस्यांची नोंद ठेवणे आदी बाबींवर योग्य पध्दतीने काम केले तर ब्रँड मोठा होतोच, परंतू स्वता:ची वेगळी ओळख निर्माण होत असते. त्यामुळे आपण सर्वांनी एकाच गाडीत बसून प्रवास करावयाचा आहे. त्याने आपण एकाच जागी आणि एकाच वेळी नियोजित जागी पोहचू असे सांगून श्री. जैन यांनी सेल्सचा आढावा घेतला. त्रैमासिक आढाव्यात त्यांनी सेल्स टीमला काही टीप्स दिल्या. वेगवेगळ्या मुद्यांवर चर्चा करून शंकांचे निरसण केले. गत तीन महिन्यात चांगली कामगिरी केलेल्या सेल्स बांधवांचे कौतूक करून शुभेच्छा दिल्या.



Star Performances...

पटेल, सुभेदार व भोयर यांना "उत्कृष्ट" कागिरीबद्दल मास्टरलाईन'तर्फे सन्मानचिन्ह

चार जणांना "धनादेशाचे वाटप" ; संचालकांची प्रमुख उपस्थिती





तीन महिन्यातील कामकाजाच्या आढावा बैठकी नंतर अतिशय उत्कृष्ट काम केल्याबद्दल (स्टार प्रफॉमन्स) मास्टरलाईन कंपनीतर्फे सेल्स विभागातील शाहरूख पटेल, प्रश्रांत सुभेदार व अमोल भोयर यांचा सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. तसेच चार जणांना धनादेश देण्यात आला. मास्टरलाईन इंजिन ऑईल कंपनीतील विविध विभागातील सेल्स कर्मचारी वर्गाची कंपनीत ७, ८ व ९ जून रोजी तिमाही आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी कंपनीचे संचालक श्री. समीरभाऊ जैन, श्री. सुयोगभाऊ जैन यांची प्रमुख उपस्थिती होती.

आढावा बैठकीत प्रशासन विभागाचे मॅनेजर श्री. मनोज महाजन, चॅनल सेल्सचे नॅशनल हेड श्री. रितेश सिंह राठौर,प्रॉडक्शन मॅनेजर हर्षल महाजन, रमजान पटेल उपस्थित होते.आयोजित आढावा बैठकीस सेल्स विभागाचे शाहरूख पटेल, शिलज पांडे, प्रश्रांत सुभेदार, समिर शेख, मसना शेख, तुषार काकुर्डे, अमोल भोयर, महेश शिरूरे, ज्ञानेश्वर गोसावी आदी हजर होते.

यातील शाहरूख पटेल, प्रश्रांत सुभेदार व अमोल भोयर यांनी गेल्या सहा व तीन महिन्यांत उत्कृष्ट कामगिरी केल्याने त्यांना "स्टार प्रफॉमन्स" असे सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन संचालक श्री. सुयोगभाऊ जैन यांच्या हस्ते गौरविण्यात आले. तर आपआपल्या विभागात डिस्ट्रीब्युटर नेमून तसेच लॉचिंग मिटींग आयोजित केल्यामुळे शिलज पांडे, किरण कांबळे, शाहरूख पटेल व प्रश्रांत सुभेदार यांना रोख रकमेचा

धनादेश देण्यात आला. आपण ज्या कंपनीत काम करीत आहोत, त्या कंपनीने कामाची दखल घेतल्याने सेल्स टीमच्या सदस्यांमध्ये आनंद दिसून येत होता. कंपनी वेळोवेळी दखल घेईल, असे आश्वासन देण्यात आले.

स्टार प्रफॉमन्सचे "तीन मानकरी"



आढावा बैठकीत स्टार प्रफॉमन्सचे तीन मानकरी ठरले असून त्यात शाहरूख पटेल यांना प्रथम बक्षिस प्राप्त झाले. त्यांच्याकडे धुळे, नंदूरबार, अमळनेर विभागाची जबाबदारी असून त्यांनी जानेवारी ते मे महिन्यात उत्कृष्ठ कामगिरी केली. तसेच त्यांना दोन नवे डिस्ट्रीब्युटर व दोन लॉंचिंग मिटिंग केल्याने दहा हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला आहे. दुसरे बक्षिस हे प्रश्रांत सुभेदार यांना मिळाले असून त्यांच्याकडे पुणे डेपोची (कोल्हापूर,सांगली, बेळगाव, सिंधुदुर्ग) धुरा आहे. त्यांनी जून महिन्याच्या पहिल्या आठवड्या पर्यंत उत्कृष्ठ कामगिरी केली असून ४ नवे डिस्ट्रीब्युटर नेमून "बॅक टू बॅक" अशा ३ लॉंचिंग मिटींग आयोजित केल्या होत्या. त्यांनाही कंपनीने स्टार "स्टार प्रफॉमन्स"चे बक्षिस व दहा हजार रूपयांचा धनादेश देऊन गौरविले आहे.तिसरे बक्षिस अमोल भोयर यांनी पटाकाविले असून त्यांच्याकडे नागपूर विभागाची जबाबदारी आहे. त्यांनीही उत्कृष्ठ कामगिरी केली असल्याने त्यांनाही सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले आहे.

चार जणांना धनादेशाचे वितरण

यात सेल्स विगातील शिलज पांडे यांनी कोपरगावात नवीन डिस्ट्रीब्युटर दिल्याने त्यांन पाच हजार रूपयांचा धनादेश देण्यात आला आहे. किरण कांबळे यांनी बारामतीत नवीन डिस्ट्रीब्युटर दिल्याने कंपनीने त्यांचीही दखल घेत त्यांना पाच हजार रूपयांचा धनादेश दिला आहे. शाहरूख पटेल यांनी नंदूरबार व खेतिया येथे नवे डिस्ट्रीब्युटर देऊन दोन लॉंचिंग मिटींग आयोजित केल्याने त्यांना दहा हजार रूपयांचा धनादेश देण्यात आला आहे. प्रश्रांत सुभेदार यांनीही बाजी मारत ४ नवे डिस्ट्रीब्युटर आणि ३ लॉंचिंग मिटींग असे दमदार नियोजन केल्याने त्यांनाही दहा हजार रूपयांचा धनादेश देण्यात आला आहे. कंपनीचे संचालक श्री. सुयोगभाऊ जैन यांनी हा गौरव केला असून पुढील कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. सुत्रसंचालन श्री. रितेश सिंह राठौर यांनी केले असून आभार मनोज महाजन यांनी मानले.







छायाचित्रात धनादेशाचा स्विकार करतांना शाहरूख पटेल, प्रश्रांत सुभेदार, शिलज पांडे, ज्ञानेश्वर गोसावी. सोबत संचालक श्री. सुयोगभाऊ जैन, रितेश सिंह राठौर, मनोज महाजन, कपिल शिंपी.





MASTERLINE EXPRESS

विश्वासावरच जग कायम - संचालक समीरभाऊ जैन



तुमच्यावर समोरील व्यक्तिचा, संस्थेचा किंवा कंपनीचा श्रीमंती ठरत असते. असं म्हणतात, विश्वासावरच जग वर्षात कंपनीत अनेक बदल झाले आहेत व पुढेही केले ताकत आहे. चांगले प्रॉडक्ट, चांगली सेवा आणि चांगली बारीक - सारीक गोष्टींकडे टीमने लक्ष केंद्रीत करून स्वतचा करून अपडेट रहावे, असे आवाहन श्री. समीरभाऊ जैन यांनी केले.

यासह बाजारपेठेचा किती विश्वास आहे, यावर तुमची खरी कायम आहे. आणि ते खरे आहे. काळानुरूप गत दोन जातील, आपल्या ब्रॅन्ड वरील विश्वासच आपली खरी सेल्स टीम यामुळे ब्रॅन्ड मोठा होत आहे. तुम्ही मोठे व्हाल, व कंपनीचा विकास करावा. यासह सोशल मिडीयाचा वापर







मास्टरलाईन इंजिन प्रा. लिमिटेड मध्ये आयोजित सेल्स विभागाच्या आढावा बैठकी दरम्यान काही खेळांचेही आयोजन करण्यात आले होते. मार्गदर्शन करतांना सुयोगभाऊ जैन.

Visit Website: http://www.masterlineworld.com

Facebook : https://www.facebook.com/MasterlineEngineOils/

Instagram : https://www.instagram.com/masterlineoil?r=nametag

YouTubechannel:https://www.youtube.com/channel/UCKe6sVrGpWPqSmLwb-lA1cQ

LinkedIn https://www.linkedin.com/.../masterline-lubricants...

Google Business https://g.page/r/CWGLkP-u3_tiEA0